# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २९/०६/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर, अमरावती व नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. औरंगाबाद विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या व तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि. १ ते २९ जून कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस २००.७ मि.मी. असून दि.२९ जून,२०२० पर्यंत २१९.५० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०९.३७ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि. १ ते २९ जून २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०५ | ठाणे, रायगड,पालघर, नंदुरबार,गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | ०७ | रत्नागिरी,सातारा, कोल्हापूर,नांदेड,अकोला,वर्धा,चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २२ | सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर ,भंडारा,गोंदिया. |

राज्यात २९ जून २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी १२ तालूक्यांत २५ ते ५० %, ५२ तालूक्यात ५० ते ७५ %, ६४ तालूक्यात ७५ ते १००% तर २२७ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**किड व रोग-**

दि.२२.०६.२०२० अखेरच्या नजर अंदाजित किडरोग अहवालानुसार राज्यात अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्हयात दि.२४.०५.२०२० ते दि.१४.०६.२०२० पर्यंत टोळधाडीचा प्रादुर्भाव आढळून आला. टोळधाडीचा झुंड दि.१४.०६.२०२० रोजी गोंदिया जिल्हयातून मध्यप्रदेश राज्यात गेला. तसेच दि.२२.०६.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार राज्यात निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण, नाशिक,पुणे व कोल्हापूर विभागातील ३३०३८ हे.क्षेत्र बाधित झाले असून, बाधित पिकांमध्ये शेतीपिके व फळ पिकांचा समावेश आहे.

## खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर ८९.५१ लाख हेक्टर क्षेत्रावर (६३.०४%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून ९०.०३ लाख हेक्टर क्षेत्रावर (५९.५%) पेरणी/लागवड झाली आहे. राज्यात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्व मशागतीची व भात तसेच नागली रोपवाटिका तयार करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. रोपवाटिकेतील रोपांची वाढ समाधानकारक आहे. धुळवाफ पेर झालेले भात पिक व लवकर पेरणी झालेले सोयाबीन पिक वाढीच्या अवस्थेत आहे. पेरणी झालेली इतर पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत. काही ठिकाणी चिखलणीची तसेच भात व नागली पिकांची पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. पिकांची उगवण समाधानकारक आहे. सर्वच विभागात पिकांच्या पेरण्यांची कामे सुरु झाली आहेत.

### सन-२०२०-२१ चे खरीप हंगामातील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## विभागीय पिक परिस्थिती-

### कोकण विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर ०.२९ लाख हेक्टर क्षेत्रावर (६.६०%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी रोपवाटिका तयार करण्याची कामे प्रगतीपथावर असून, भात व नाचणी पिकाची अनुक्रमे ३३,४३२ हे. व २,१९६ हे. क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. रोपवाटिकेतील रोपांची वाढ समाधानकारक आहे. काही ठिकाणी भात लागवड करण्यासाठी चिखलणीची तसेच भात व नाचणीच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.

### नाशिक विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर १४.४० लाख हेक्टर क्षेत्रावर (६७.९६%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप ज्वारी, बाजरी, मका, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीची कामे सुरु झाली आहेत.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर ६.०६ लाख हेक्टर क्षेत्रावर (६९.८७%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामाच्या पेरणी करीता पूर्व मशागतीची तसेच भात व नाचणी रोपवाटीकांमध्ये पेरणीची कामे सुरु आहेत. पुणे जिल्हयात भात व नाचणी पिकाची अनुक्रमे ३,४३९ हे. व ५२ हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. बाजरी, मका, मूग, भुईमूग, सोयाबीन व सुर्यफुल पिकांची पेरणी प्रगतीपथावर आहे. पेरणी झालेली पिके उगवणीच्या अवस्थेत असून, पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर ४.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (५७.०३%) पेरणी झाली आहे. विभागात चालु सप्ताहात पावसाने उघडीप दिली आहे. धुळवाफ पेर झालेल्या ठिकाणी भात वाढीच्या अवस्थेत आहे. भाताची रोप लागण काही प्रमाणात चालू आहे. रागी पिकाच्या रोपवाटिका तयार असून, अद्याप रोपे लागणीची कामे सुरु झाली नाहीत. लवकर पेर झालेले सोयाबीन पिक वाढीच्या अवस्थेत आहे. इतर पिकांच्या पेरण्या संथ गतीने सुरु आहेत. पेरण्या झालेल्या ठिकाणी पिके उगवण अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. आंतरमशागतीचे व खते देण्याची कामे चालू आहेत.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर १५.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (७४.७९%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, मका, बाजरी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांची पेरणी सुरु असून, काही ठिकाणी उगवण झाली आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर १६.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर (६०.५३%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, मका, बाजरी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. पेरणी झालेली पिके उगवण अवस्थेत आहेत.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर २४.०० लाख हेक्टर क्षेत्रावर (७४.६९%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, तूर, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. पेरणी झालेली पिके उगवण अवस्थेत आहेत.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशतः ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२९ जून २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (४१.९४%) पेरणी झाली आहे. विभागात सोयाबीन, तूर, कापूस पिकांची पेरणी सुरु आहे. भात पिकाचे नर्सरी टाकण्याची कामे सुरु आहेत. भात पऱ्हे टाकलेले आहे व आवत्यांची पेरणी झालेली आहे. जमीनीच्या मशागतीची कामे पुर्ण झाली आहे.